# Home-Science Extension Activities

### पोस्टर आणि स्लोगन स्पर्धेचे आयोजन

दिनांक २७.०९.२०२२ रोजी श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयातील संप्रेषण आणि विस्तार शिक्षण, गृह विज्ञान विभागाच्या वतीने महाविद्यालयात पर्यावरणाच्या समृद्धीसाठी जनजागृती व्हावी या हेतूने पोस्टर आणि स्लोगन स्पर्धेच्या आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत विद्यार्थिनींनी उस्फूर्तपणे सहभाग घेतला. महाविद्यालयाची प्राचार्य डॉ. गणेश पाटील यांनी या स्पर्धेचे उद्घाटन केले यशस्वी विद्यार्थिनींचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

### आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन साजरा (World Literacy Day 2022)

दिनांक ८.०८.२०२२ रोजी श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयातील संप्रेषण आणि विस्तार शिक्षण, गृह विज्ञान विभागाच्या वतीने महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस साजरा करण्यात आला. आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस साजरा करण्याचा मुख्य उद्देश म्हणजे विद्यार्थिनीमध्ये शिक्षणाविषयी जागरूकता निर्माण करणे तसेच विद्यार्थिनींचे शिक्षणाकडे लक्ष वेधणे असा आहे. आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवसाचे औचत्य साधून ऑनलाईन प्रश्न मंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील कला शाखा गृहविज्ञान शाखा आणि वाणिज्य शाखेच्या अधिकाधिक विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला.

### पिंपळखुटा येथील अंगणवाडीला शैक्षणिक भेट

दिनांक २७.०४.२०२२ रोजी जिल्हा परिषद पिंपळखुटा येथे शैक्षणिक भेट देण्यात आली विद्यार्थिनींना एकात्मिक बाल विकास सेवा योजनेद्वारे मिळणाऱ्या सेवा आणि कार्यक्रमाबद्दल सविस्तर माहिती मिळावी हा या शैक्षणिक भेटीचा उद्देश होता या भेटी अंतर्गत विद्यार्थिनींना एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत शून्य ते एक वयोगटातील बालकांचे वजन व उंची मोजण्याचे प्रात्यक्षिक दाखविले आणि अंगणवाडीतील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असणारे शैक्षणिक साहित्याची उपयोगिता समजावून सांगितली. सोबतच अंगणवाडी केंद्रातर्फे पूरक आहाराचे वाटप व मातांना आहारविषयक समूह समुपदेशन केले जाते ही माहिती सांगितली. अंगणवाडी हे व्यक्तीच्या शारीरिक मानसिक आणि सामाजिक विकासाचा प्राथमिक पाया आहे हे विद्यार्थिनींना दर्शवून द्यावयाची होते.

### पर्यावरण विषयक जनजागृती रॅली

दिनांक २७.०९.२०२२ रोजी श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयातील गृह विज्ञान विभागाच्या सर्व विद्यार्थिनी आणि जनता शिक्षण प्रसारक मंडळ शाळेचे विद्यार्थी आणि कर्मचारी यांच्या सक्रिय सहभागाने पर्यावरण विषयक जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण प्रदूषण ही समस्या दिवसेंदिवस वाढतच आहे, औद्योगिक कचरा थेट मातीत, पाण्यामध्ये आणि हवेत मिसळत आहे. एवढे असूनही लोक प्रदूषणाला आणि त्याच्या परिणामाला गांभीर्याने घेत नाही आहेत त्यामुळे समाजात पर्यावरण

विषयक जनजागृती करण्याकरिता रॅली चे आयोजन करण्यात आले होते. रॅलीला हिरवी झेंडी प्रा. संजय सुपे यांच्या हस्ते देण्यात आली. तसेच विद्यार्थिनींनी परिसर स्वच्छतेची मोहीम राबवून महाविद्यालयीन परिसर सुद्धा स्वच्छ केला.

### पर्यावरण विषयक पथनाट्य

दिनांक २७.०९.२०२२ रोजी श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयातील गृह विज्ञान (भाग I) विभागाच्या विद्यार्थिनी परिसर स्वच्छ तर देश स्वच्छ याकरिता स्वच्छतेची सुरुवात स्वतः पासूनच करावयास हवी अशी संकल्पना घेऊन महाविद्यालयीन परिसरात पर्यावरण विषयक जनजागृती व्हावी म्हणून सुंदर पथनाट्य सादर केले आणि सर्वांसह आम्ही आमचा परिसर स्वच्छ राखू अशी शपथ घेतली.


गृहविज्ञान विभाग
GPS Map Camera
Mali
Nigeria
Google
Pusad, Maharashtra, India
WH5G+FFR, Pusad, Maharashtra 445216, India
Lat 19.908797°
Long 77.576091°
27/09/22 11:27 AM


जनता शिक्षण प्रसारक मंडळ
श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला
महाविद्यालय, पुसद
गृहविज्ञान विभाग


सुस्वागतम
GPS Map Camera
Google
Pusad, Maharashtra, India
WH5F+6H8, Pusad, Maharashtra
445216, India
Lat 19.907899°
Long 77.573978°
04/03/23 12:12 PM GMT +05:30


जनता शिक्षण प्रसारक मंडळ
श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद
गृहविज्ञान विभाग


गृहविज्ञान विभाग
GPS Map Camera
Pusad, Maharashtra, India
WH5F+79R, Pusad, Maharashtra 445216, India
Lat 19.908032°
Long 77.573322°
03/04/23 10:26 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Pusad, Maharashtra, India
WH4F+W86, Pusad, Maharashtra 445204, India
Lat 19.907348°
Long 77.573016°
27/09/22 01:50 PM
Google